# अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई

---

**-: प्रेस नोट :-** **दि. २६/०८/२०२३**

**सकिनाका, मरोळ परिसरात ''मेफेड्रॉन (M.D.)'' या अंमली पदार्थाचा व्यवसाय करणाऱ्या २ सराईत गुन्हेगारांस अटक करुन एकुण ४६ लाख किंमतीचा अंमली पदार्थ जप्त.**

| | |
|---|---|
| अंमली पदार्थ विरोधी कक्ष | बांद्रा युनिट, अं.प.वि. कक्ष, गु.शा., मुंबई |
| गु.र.क्र. व कलम | ७५/२०२३, कलम ८(क) सह २२(क), २९ एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ |
| गुन्हा घडला दि. व वेळ | दि. २५/०८/२३ रोजीचे २३:०० ते दि. २६/०८/२३ रोजीचे ०१:०० वा. दरम्यान |
| गुन्हा दाखल दिनांक | दि. २६/०८/२०२३ रोजी ०४.०० वाजता |
| घटनास्थळ | बिल्डीग नं. ७ च्या बाजुला, स्नेह नगर को.ऑ.हौ.सोसा., सागबाग, मरोळ, अंधेरी पुर्व, मंबई ४०००५९ |
| अटक आरोपी | **दोन (०२) इसम** |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | **एकुण - २३० ग्रॅम वजनाचा ''मेफेड्रॉन (M.D.)'' हा अंमली पदार्थ, दोन मोबाईलसह (अं.किं. ४६,३१,०००/- रू.)** |

मुंबई शहरामध्ये तरुणांना अंमली पदार्थ विकणाऱ्या ड्रग पेडलर व विक्रेत्यांविरुदध कारवाई करण्याबाबत मा.वरिष्ठांनी आदेश दिल्याने तसेच साकिनाका, मरोळ भागात अंमली पदार्थ विक्री बाबत वाढत्या तक्रारीच्या अनुशंगाने बांद्रा युनिट, अंमली पदार्थ विरोधी कक्ष हे साकिनाका, मरोळ भागात गस्त करीत असतांना दोन (०२) इसम एकुन २३० ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (M.D.) या अंमली पदार्थासह मिळुन आल्याने त्यांचेविरुध्द अं.प.वि. कक्ष बांद्रा युनिट, गुन्हे शाखा, मुंबई यांनी गु.र.नं. ७५/२०२३, कलम ८(क) सह २२(क), २९ एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंद करुन नमुद अटक आरोपीतांकडुन **एकुण २३० ग्रॅम वजनाचा 'मेफेड्रॉन (M.D.)' हा अंमली पदार्थ, दोन मोबाईलसह (अं.किं. ४६,३१,०००/- रू.)** जप्त करण्यात आला आहे.

नमुद अटक आरोपीत इसम हे **सराईत गुन्हेगार** असुन त्यांच्यावर यापुर्वी आरोपीत क्र. ०१ याचेविरुदध १) दहशतवाद विरोधी पथक, पुणे शहर यांचेकडील कोंडवा पो.ठा.०६१३/२०१८, कलम ८(क), सहकलम २२(क), २९ एन.डी.पी.एस. कायदा कलम १९८५ अन्वये तसेच २) एम.आय.डी.सी. पो.ठा. गु.र.क्र. ३०१/१३, कलम ३७६, ३२४ भादवि. व ३) पवई पो.ठा. गुरक्र. ४१९/१३, कलम ३२४ भादवि. अन्वये गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी क्र. ०२ याचे विरुदध विक्रोळी पोलीस ठाणेस झुगार प्रतिबंध कायदयान्वये २ गुन्हे दाखल आहेत. तसेच नमुद अटक आरोपी हे 'मेफेड्रॉन (M.D.)' या अंमली पदार्थाचा मुंबई शहरात व उपनगरातील परिसरात विशेषत: तरुणांना व्रिकी करत असल्याचे माहिती मिळुन आली आहे. अटक आरोपीतांकडे त्यांचे आणखी कोणी साथीदार अथवा त्यांची एखादी टोळी आहे काय? याबाबत सविस्तर तपास बांद्रा युनिट, अंपवि.कक्ष करत आहे.

**अशाप्रकारे बृहन्मुंबई पोलीस हे अंमली पदार्थ मुक्त समाज निर्मितीसाठी सतत प्रयत्नशिल आहेत.**

सदरची यशस्वी कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा.विशेष पोलीस आयुक्त, श्री.देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना, मा.पोलीस उप आयुक्त श्री.प्रकाश जाधव, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री. दत्तात्रय नाळे (अति.कार्यभार), अंमली पदार्थ विरोधी कक्ष, पो.नि. किरण लोंढे(प्रशासन) अंपवि. यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिटचे प्रपोनि. संजय चव्हाण यांचे नेतृत्वाखाली, स.पो.नि. सुरेश भोये, स.पो.नि. श्रीकांत कारकर, स.पो.नि. दादा गायकवाड, पो.ह.क्र. ०४०८४८/मांढरे, पो.ह.क्र. ३३४५५/देसाई, पो.ह.क्र. ०४०८२२/खुस्पे, पो.ह.क्र. १४५६/महाडेश्वर, म.पो.शि.क्र. ९७०४४०/नाईक, पो.शि.०८१०५६/राठोड, पो.शि.क्र. ००३०४/सौंदाणे, पो.शि.क्र. ०७९८३/मोहिते, पो.शि.क्र. ०८०६२०/खारे, पो.शि.क्र.०९०३४२/केंद्रे, पो.शि.क्र. ११३१३५/शेडगे, स.फौ.चा.२८७०३/शेख, पो.शि.चा. १९०६०८/भोर यांनी पार पाडली असुन गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. सुरेश भोये करीत आहेत.

-00-